प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेल्या ध्यानाचा आणि भावना आणि विचारांच्या सकारात्मकतेचा एक विशिष्ट मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण दिव्य प्रकाशाचा (परमेश्वर) एक कण आहोत
★ प्रेम हा आपला मूळ स्वभाव आहे
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.


# प्रकाशमार्ग

Volume 2 Issue 2 NOVEMBER 2009 Rs. 15


## चिंतन

गुरुजी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

आता काही टी.व्ही. चॅनल्सनी, "२०१२ सालात जगाचा अंत होणार आहे" असं सांगायला सुरुवात केल्यानंतर लोकांमध्ये घबराट निर्माण होऊ लागली आहे. लोक आता यावर चर्चा करीत आहेत. पुष्कळ लोक याबद्दल साशंक आहेत तर पुष्कळ लोकांना ही गंमत वाटते आहे. पुष्कळ लोक घाबरले आहेत. २०१२ सालाच्या या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी कशी तयारी करावी, हे फक्त फार थोड्या लोकांनाच माहीत आहे.

सर्वप्रथम आपण हे जाणून घ्यायला हवे की, या जगाचा अंत होणार नाही. कदाचित या जगाला खूप दुःखातून जावे लागेल व विपदांना सामोरे जावे लागेल. आपण जर सत्ययुगाच्या पद्धती निवडल्या आणि त्याप्रमाणे जगायला सुरुवात केली तर आपण दुःख टाळू शकतो. आपल्याला एक चांगला माणूस म्हणून जगण्याची, प्रामाणिक राहण्याची आणि शांतीपूर्ण जीवन जगण्याची निवड करायला हवी. ही साधी पण आचरणात आणण्यासाठी कठीण असणारी तत्त्वे आपल्यासाठी अनोळखी नाहीत. आपण कधीच या तत्त्वांची पर्वा केली नाही आणि कलियुगात, ज्याचा आता अंत झाला आहे, कलियुगाच्या जीवनपद्धतीप्रमाणे जीवन जगत राहिलो. आता आपण नव्या प्रकाशयुगात प्रवेश करण्यापूर्वी युगपरिवर्तनाच्या काळात राहतो आहोत.

या गोष्टी लोकांना नीट समजावून सांगायला हव्या. पण प्रसार माध्यमे किंवा मीडिया भीती आणि सनसनाटी निर्माण करणाऱ्या गोष्टींकडे जास्त लक्ष देतात. लोकांनी मार्गदर्शनासाठी प्रकाश कार्यकर्त्यांकडे आणि प्रकाश दाखविणाऱ्या गुरुंकडे जायला हवे. एकदा का लोकांनी प्रकाशाचा मार्ग निवडला की प्रकाश त्यांना योग्य लोकांकडे पाठवतो.

आपण घाबरून जायला नको, कारण घाबरल्याने आपण कमकुवत होतो. घाबरल्याने आपण संभ्रमात पडतो आणि उताविळ होतो. अशा अवस्थेत आपण ज्योतिषींकडे आणि पुजाऱ्यांकडे धाव घेतो. ते आपले मार्गदर्शन करू शकत नाहीत. जुन्या व्यवस्थेचे स्वामी आणि गुरु आपले मार्गदर्शन करू शकत नाहीत. फक्त प्रकाशाचे माध्यम असणारे किंवा त्यांच्या संपर्कात असणारे लोकच आपल्याला मार्गदर्शन करू शकतात. अशी माध्यमे किंवा त्यांच्या संपर्कात असणारे लोक फारच थोडे असले तरी ते उपलब्ध आहेत.

आपण जर योग्य मार्गात ध्यान साधना केली तर आपले ध्यान आपल्याला योग्य लोकांकडे घेऊन जाते. मी इथे 'योग्य मार्ग' असा उल्लेख करीत आहे कारण असे कित्येक मार्ग आहेत जे योग्य नाहीत. अर्थात् आपली शुद्ध भावना आपल्याला योग्य मार्गाकडे, योग्य माणसाकडे आणि योग्य मार्गदर्शनाकडेच घेऊन जाते.

आमच्या कार्याचा भर साहजिकच २०१२ सालाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी तयारी करण्यावर आहे. १९७४ सालापासून ऋषींनी आपल्याला ध्यान करायला शिकवले आणि सत्ययुगाबद्दल नवीन ज्ञान आपल्यापुढे ठेवले. तेव्हा सत्ययुगात प्रवेश करण्यासाठी युगपरिवर्तनाचा काळ ४३२ वर्षांचा होता. २००९ साली त्यांनी हा युगपरिवर्तनाचा काळ कमी करून, २१ डिसेंबर २००९ पासून फक्त तीन वर्षांचा केला आहे. ज्यात सर्व बदल दाटीवाटीने भरले आहेत अशी ही तीन वर्षे फार कठीण जाणार आहेत ह्यात शंका नाही, पण ध्यान करून, ऋषींच्या आणि प्रकाश कार्यकर्त्यांच्या मदतीने आपण सहजच या काळातून सुखरूप बाहेर पडू.

हा संदेश आपण सर्वांपर्यंत पोचवायला हवा. लोक कदाचित हा संदेश एकदम आत्मसात करू शकणार नाहीत, पण लवकरच त्यांना ह्याचा बोध होईल.


मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, बंगलोर अर्बन ५६२ १४९. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१ (सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत)
इ–मेल : info@saptarishis.com वेबसाईट : www.saptarishis.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिले कॉलम वाचावे.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. २००/-**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



गुरूजी, आनेकल येथे दीप प्रज्वलित करून सभागृहाचे उद्घाटन करताना

## काही ठळक घडामोडी

- ६-११-२००९ ते १५-११-२००९ पर्यंत पॅलेस ग्राऊंड्स, बंगलोर येथे होणाऱ्या 'बंगलोर बुक फेस्टिव्हल' मधे सलग तिसऱ्या वर्षी आम्ही भाग घेणार आहोत. साधकांनी भेट देऊन उत्साह वाढवावा.
- 'Beyond 2012' ह्या पुस्तकाचा मराठी व कन्नड भाषांतील अनुवाद आता उपलब्ध आहे.
- उत्साही आणि कुशल स्वयंसेवकांचा एक गट आपल्या वेब-साईट्सची पुनर्रचना करीत आहे.
- ज्या साधकांनी चक्र-जागृतीकरण या पातळीवरील साधना पूर्ण केली आहे, ते 'शंबला गटात' सामील होऊ शकतात. नवी बॅच १०-०१-२०१० पासून सुरू होईल.
- १८-१०-२००९ रोजी तपोनगर येथे ४० पेक्षाही अधिक लोकांनी जमून फटाके उडवून दिवाळी साजरी केली.
- २१-११-२००९ रोजी गुरूजींसोबत विशेष रिट्रीट चे आयोजन करण्यात येईल.

**आपले बाहेरील विद्यार्थी रविशंकर एस. नियमित लाईट चॅनल्सचे सत्र चालवतात**

**दर शनिवारी दुपारी ३ वाजता**
**स्थळ: मारिया फिओरा डान्स स्टूडिओ, २०१ समर स्ट्रीट, स्टॅमफर्ड, कनेक्टिकट ०६९०१**

**दर बुधवारी संध्याकाळी ७ वाजता**
**स्थळ: प्रायोरिटी फिटनेस सेंटर, १६७ साऊथ अवेन्यू, न्यू कॅनान, कनेक्टिकट ०६८४०**

## रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

| | |
|---|---|
| अनिल जोशी | १३-०९-२००९ |
| कश्यप जी.व्ही., अंजली पाटील, रत्ना राव आणि भूदेवी | २०-०९-२००९ |
| रमेश, रामनारायणन पी.एस. आणि प्रियंका मिश्रा | २७-०९-२००९ |

## तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| ८ नोव्हेंबर | – शंबला ग्रूप ची बैठक दुपारी २ वाजता |
| १५ नोव्हेंबर | – 'रा'गटाची बैठक दुपारी २ वाजता<br>लाईट चॅनल्स गटाची बैठक दुपारी २.३० वाजता |
| २१ नोव्हेंबर | – गुरूजींसोबत विशेष रिट्रीट |
| २९ नोव्हेंबर | – अखंड ध्यान, सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०२ | सोमवार | पौर्णिमा |
| १० | मंगळवार | कृष्णाष्टमी |
| १५ | रविवार | शिवरात्री |
| १६ | सोमवार | अमावास्या |
| २७ | शुक्रवार | शुक्ल दशमी |

**रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.**

## खरेपणा

वैशाली जोशी, अनुवाद : गुरुराज कानाडे

आपण आपल्या जीवनाची घडण नैतिक मूल्यांवर आधारित करायला हवी. खरेपणा, या नैतिक मूल्य प्रणालीचा एक महत्त्वाचा घटक आहे. आपल्या दैनंदिन आचरणात हे उतरविण्याकरिता, खरेपणा म्हणजे नक्की काय, हे व्यवस्थितपणे समजावून घेतले पाहिजे. खरेपणा म्हणजे वास्तविकता किंवा सत्यस्थिती कथन करणे. सत्य नेहमीच चांगले असते पण वास्तविकता तशी असेलच असे नाही.

आपल्याला सत्य व वास्तविकता यातील फरक समजावून घेतला पाहिजे. ज्यामुळे दुःख होईल अशा किंवा कटु वास्तविकतेबद्दल बोलणे टाळले पाहिजे. किंवा जर अगदीच आवश्यक असेल तर ते अगदी दूरदर्शीपणे सांगितले पाहिजे. तसेच या जगात वावरण्याकरिता किंवा इतरांकडून होणारी अनावश्यक चौकशी किंवा ढवळाढवळ टाळण्याकरिता खोटे बोलणे, फायदेशीर ठरण्याऐवजी, आपले मोठे नुकसानच करते.

नेहमी शांततामय व प्रकाशमय जीवन जगता यावे याकरिता, आपण खरेपणा या तत्त्वाचे जीवनात आचरण करण्याचा प्रयत्न करत असताना, आपल्या सुजाणतेचा वापर करावयास शिकले पाहिजे. ❑

## ध्यानसाधकांकरिता मास्टर 'व्ही' ह्यांच्याकडून विशेष सूचना

१. नेहमी शांत राहावे. राग आल्यास सप्तर्षी प्राणायामाचा तीन वेळा सराव करावा आणि त्यानंतर पहिल्या शंबला तत्त्वाचा अभ्यास करावा.
२. नकारात्मक प्रवृत्तीच्या लोकांपासून दूर राहावे. असे करणे जर शक्य नसेल तर स्वतःला निळ्या शक्तींनी भरून घ्यावे.
३. अवघड परिस्थितीत मास्टर 'व्ही' ह्यांच्याशी मानसिक संपर्क साधावा.
४. काही अडचणींमुळे जर एखाद्या दिवशी ध्यान करण्यास जमले नाही तर,
   - कवच मजबूत करावे.
   - पहिल्या शंबला तत्त्वाचा शक्य तितका अभ्यास करावा.
   - हे देखील जमले नाही, तर, मास्टर 'व्ही' ह्यांच्याशी मानसिक संपर्क साधून प्रार्थना करावी.
५. धार्मिक सोपस्कार, विधी इत्यादींचे पालन टाळावे. या विधींवर काळ्या शक्ती नियंत्रण करीत आहेत.
६. काही काळ ध्यान करणे अवघड जाईल. काळजी करू नये. प्रकाशाचा जास्त अनुभव घ्यावा.
७. १६–१०–२००९ पासून फार थोडा मोजकाच वेळ आता आपल्या जवळ आहे. प्रकाश आणि नकारात्मकता यापैकी एकाची स्पष्ट निवड आपण केली पाहिजे व आपल्या निर्णयाशी सतत अढळ राहिले पाहिजे. ❑

## तपोनगर डायरी

श्यामला देवी, अनुवाद : गुरुराज कानाडे

गुरुजींचे मार्गदर्शन घेण्यासाठी शंबला गट दिनांक १३ सप्टेंबर रोजी जमला होता. त्यांच्या प्रखर साधनेत त्यांना मदत मिळावी म्हणून शंबला कडून त्यांना विशेष शक्ती मिळाल्या. हा गट बलवान होतो आहे अविचलपणे प्रगती करीत आहे आणि अभ्यासाबाबत गंभीर होतो आहे. पत्रव्यवहाराद्वारे मार्गदर्शन घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वर्ष २००९ जणू काही वरदानच ठरले आहे कारण या वर्षापासून या विशेष गटाचे सभासदत्व त्यांना देखील उपलब्ध झाले आहे.

नाडगौडा गोलाहल्ली येथील येलम्मादेवीच्या जीर्णोद्धारित मंदिराचे उद्घाटन दिनांक १९ सप्टेंबर रोजी गुरुजींच्या शुभहस्ते करण्यात आले. सुमारे १०० साधक या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

गुरुजींसोबत मासिक रिट्रीटची लोक अगदी आतुरतेने वाट पाहत असतात. रिट्रीट सत्राचे दोन तास गुरुजींसमवेत घालवण्याची व त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधण्याची संधी कोणालाही गमवावीशी वाटत नाही. हे रिट्रीट सत्र या महिन्यात दिनांक २६ सप्टेंबर रोजी झाले.

ज्या शाळेत गुरुजींनी शिक्षण घेतले तेथे चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात असे गुरुजींचे स्वप्न होते. असेच स्वप्न बाळगणारे त्यांचे सवंगडी श्री. कृष्णमूर्ती व गुरुजी, या दोघांनी मिळून, आनेकल येथील त्यांच्या प्रिय शाळेसाठी एक सभागृह बांधून दिले. २१ सप्टेंबरला या सभागृहाचे मोठ्या थाटात उद्घाटन झाले.

आनेकल म्हणजेच गुरुजींचे मूळगाव. येथील गावकऱ्यांनी गुरुजींना दिनांक २८ सप्टेंबर रोजी त्यांच्यासमवेत दसरा साजरा करण्याचे आमंत्रण दिले होते. हा दिव्य सोहळा पाहण्यासाठी संपूर्ण आनेकल गावच लोटले होते, इतकेच नव्हे तर आसपासच्या ठिकाणाहून देखील लोक आले होते.

दिनांक २ ऑक्टोबर रोजी, गुरुजींना खूप प्रिय असलेल्या अभिनंदनचा विवाह तपोनगरात ऋषींच्या पद्धतीप्रमाणे पार पडला. गुरुजींनी पार पाडलेला हा विवाह सोहळा, कोणत्याही मंत्रोच्चाराशिवाय किंवा धार्मिक विधींशिवाय अगदी काही मिनिटांतच संपन्न झाला. या विवाहाला थोर ऋषींचे आशीर्वाद लाभले आणि जमलेल्या शेकडो मित्रांनी व आप्तांनी या समारंभाला दाद दिली. ❑

## प्रकाश प्रसारणाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणातील चळवळ आहे. आपल्या या जगात सर्वांना शांती आणि प्रेमाचे जीवन जगता यावे त्यासाठी ही चळवळ आहे. व्याख्यानं, उपदेशं आणि पताका नसलेली ही अशी वेगळीच चळवळ आहे. वरील उच्च जगांतून फक्त प्रकाश पृथ्वीवर आणावा आणि सर्वत्र प्रसारित करावा, एवढेच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाही, ते सर्व हा प्रकाशच घडवून आणू शकतो.

जेव्हा आपण हा प्रकाश सर्वत्र पसरवतो, तेव्हा तो इतरांच्या घरात व त्यांच्या हृदयात प्रवेश करतो. त्यांच्या भावना आणि विचारांमधे असलेल्या अंधःकाराला हा प्रकाश दूर करतो आणि अशाप्रकारे वैयक्तिक बदलाव होतात. वैयक्तिक बदलावांमुळे सर्व जगच बदलायला सुरुवात होते आणि प्रकाशमय होते.

हा प्रकाश म्हणजे आपल्या डोळ्यांना दिसत असलेला प्रकाश नसून हा अस्तित्वाच्या गाभ्यातील अतिसूक्ष्म प्रकाश आहे. अस्तित्वाच्या ह्या गाभ्यातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्वकाही आहे; ताकद आहे, शहाणपण आहे आणि सृष्टीचे भवितव्य पण आहे. तो अदृश्य आहे पण सर्वत्र पसरलेला आहे.

**आपण दर रोज ७ मिनिटांसाठी हा प्रकाश वरून पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवू शकतो. झोपून उठल्यावर सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी आपण ह्याचा अभ्यास करू शकतो आणि या जगात बदल घडवून आणू शकतो.**

या जागतिक चळवळीची सुरुवात १८–५–२००८ ला तारामंडलीय परिषदेनी, सप्तर्षींनी, गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत सुरु केली.

ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**प्राचीन ऋषींनी दिलेली ही सात तत्त्वे आहेत. आपल्या पृथ्वीवर असलेले प्रकाशाचे शहर शंबला येथे राहणारे लोक या तत्त्वांचा अभ्यास करतात. शंबलातील लोक चिरतरुण आहेत आणि ते शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगत असतात.**

१. आपल्या अंतरंगात, गाभ्यात असलेल्या प्रकाशाचा अनुभव करावा आणि सभोवताली पसरवावा.
२. प्रेमाचा अनुभव करावा आणि हे प्रेम सर्वत्र पसरवावे.
३. सर्व जीवांमधे आणि सर्व निर्जीव वस्तुंमधे जीवनाच्या एकत्वाचा अनुभव करावा.
४. दिवसाची सुरुवात करतांना, त्यादिवशी जी कामं करायची आहेत, ती आधी मनात ठरवावी, मग ती हळू आवाजात स्वतःशीच पुटपुटावीत आणि मग ती कामं प्रत्यक्ष करावीत.
५. आपले ध्येय पूर्ण होण्याआधी त्याबद्दल कमीत कमी बोलून, गुप्ततेच्या नियमाचे पालन करावे.
६. आपल्यातील नकारात्मक शक्तींशी लढा देण्यासाठी मन, बुद्धी आणि शरीर यांना एकजूट करावे.
७. उच्च आध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी आपण स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवावी.

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

**६–९–२००९**

लाखो वर्षे ही चराचर सृष्टी आपल्यात बदल घडेल म्हणून प्रतीक्षा करत आली आहे आणि आता तिची सहनशीलता संपत आली आहे.

आपल्याला देवाने इच्छास्वातंत्र्य दिले आहे त्यामुळे आपण नेहमी चुकीच्या गोष्टींची निवड करतो. हे असे कायम चालू शकणार नाही. आयुष्यात कदाचित इतर कार्यपद्धती असतील. पण आपण नेहमी नेहमी इतरच गोष्टींची निवड करून चांगल्या गोष्टींना मुकावे असे होऊ शकत नाही. कधी कधी चांगल्या गोष्टी सुद्धा लादाव्या लागतात. असे यापूर्वी कधीही घडले नव्हते. यापुढे मात्र असा प्रयत्न केला जाईल.

काळ्या म्हणजेच दुष्ट शक्ती फार सक्रिय झाल्या आहेत. त्यांची अस्तित्वासाठी शेवटची लढाई सुरू आहे. आपल्याला गोंधळवून टाकण्याचा आणि त्यांच्या पद्धती आपल्यावर लादण्याचा त्यांनी चंगच बांधला आहे. त्यामुळे अतिशय सावध राहा. हा मंत्र पाळा: "ओळखा आणि संबंध तोडा. नकारात्मक विचार आणि नकारात्मक माणसांपासून स्वतःला दूर ठेवा." कधी कधी सज्जन माणसे सुद्धा अतिशय वाईट शक्तींचे वाहक बनतात. जेव्हा एखादा माणूस चिडतो तेव्हा तो वाईट शक्तींसाठी उत्कृष्ट माध्यम असतो. एक छोटेसे छिद्र देखील पुरेसे असते. त्यातून दुष्ट शक्ती त्यांची सर्व ताकद ठासून भरतात. एखादे दिवशी आपल्याला अचानक समजते की आपल्याला काय होते आहे. असे झाले तर इतकी वर्षे आपण जे प्रयत्नपूर्वक उभारले ते सर्व क्षणार्धात वितळून जाईल, नष्ट होईल. म्हणून आपण ह्या गोष्टींपासून सावध राहूया.

या सर्वांवर एक साधा उपाय आहे आणि तो म्हणजे तुमच्या आत प्रकाश तेवत ठेवणे. प्रकाश तुम्हाला अशा गोष्टींपासून दूर ठेवेल आणि तुम्हाला परमेश्वरी शक्तीशी जोडलेले ठेवेल.

आपण इतरांच्या मामल्यात दखल न देणे बरे कारण, तसे करून आपण त्यांच्या थोड्या कर्मात सहभागी होतो आणि त्या व्यक्तीला विशिष्ट धडा शिकू देत नाही. ही गोष्ट शक्ती संक्रमित करून वेदना बरी करणाऱ्या व्यक्तींना सुद्धा लागू आहे. त्यांनी विवेकी असले पाहिजे.

तुमच्या साधनेविषयी कोणाशी चर्चा करू नका की तुम्हाला दिलेली तंत्रे इतरांना देऊ नका. तुम्हाला येणारे अनुभव फक्त आम्हाला सांगा. कधीही दर्पोक्ती करू नका किंवा तुमच्या इच्छा आकांक्षांबद्दल अतिशयोक्ती करू नका. सर्व शंबला तत्त्वांचे पालन करा, ध्यान करा, सकारात्मक बना आणि आत्मनिरीक्षण करा.

आयुष्याचे आध्यात्मिक अंग आणि लौकिक अंग ह्यापैकी कोणाकडेही दुर्लक्ष न करता दोघात समतोल साधण्यावर महर्षी अमर अतिशय भर देत. ते म्हणायचे, "तुमच्या गुरुंच्या मागून डोळे मिटून जा. श्रद्धा आणि अश्रद्धा ही जणू दोन चाके आहेत. तुम्ही या दोन्ही चाकांवर स्वार झाले पाहिजे. स्वतःचे प्रवास स्वतः करा. त्याच वेळी तुम्हाला नवीन जगे दिसतील." त्यांनी आपल्याला सांगितले की पूजेच्या नवीन पद्धती आहेत, तरीही जुन्या पद्धतींचा आपण उपहास करता कामा नये; वैयक्तिक पातळीवर भ्रष्ट व्यवस्थेशी संघर्ष करण्यात आपण वेळ फुकट घालवता कामा नये. त्यांचा क्रांतीपेक्षा चळवळींवर विश्वास होता. ते म्हणायचे की आपण ध्यान केले पाहिजे, अनुभव घेतला पाहिजे आणि पुष्कळ वेळ आतील विश्वांत घालवला पाहिजे. तसेच आपण निसर्गाचा आनंद घेतला पाहिजे आणि त्यात ईश्वराची अनुभूती घेतली पाहिजे. एखादा माणूस अतिशय ऐषोआरामात राहत असून सुद्धा विरक्त असू शकतो. परंतु केवळ ऐषोआरामाचा त्याग करून दारिद्र्याचा स्वीकार केल्याने माणूस आध्यात्मिक बनत नाही.

२५ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट दरम्यानच्या शक्तींच्या प्रवहनामध्ये सोलुंट्राने सुद्धा भाग घेतला होता. तिने आम्हाला सांगितले की जगभरात निरनिराळ्या भागातील लोकांनी एक नवीन, विलक्षण आणि विशेष शक्ती पृथ्वीवर अवतरताना पाहिली. यावरुन असे दिसते की असे बरेच लोक आहेत, जे निरीक्षण करत आहेत आणि पृथ्वीतलावर प्रकाश आणण्यासाठी काम करत आहेत.

जर आपल्याला इतरांना एखादी गोष्ट स्पष्ट करून सांगायची असेल तर आधी आपण तो विषय अंतर्बाह्य समजून घेतला पाहिजे. नाहीतर आपण त्यांचे नुकसान करू.

**१३–०९–२००९**

काही मोजक्या स्वार्थी माणसांनी सुरू केलेल्या रूढींच्या जोखडातून बंधमुक्त होण्याची वेळ आता आली आहे. महर्षी अमरांनी आम्हाला कधीच धार्मिक विधी करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल आग्रह केला नाही. ते निखळ सत्य आमच्या समोर ठेवत असत. जेव्हा आपल्याला ते समजते तेव्हा आपण केवळ योग्य गोष्टींचीच निवड करतो.

सृष्टीमध्ये ज्या सुधारणा होऊ घातल्या आहेत त्यांचा मी थोडा उल्लेख करतो. यापुढे कदाचित आकाशिक नोंदी असणार नाहीत कारण त्यातील भूतकाळ कदाचित पुसला जाईल. पुनर्जन्माची गरज उरणार नाही कारण आपल्याला कर्मे त्याची त्याच जन्मात फेडावी लागतील. ऋषींची सेवा करण्यासाठी किंवा इतरांना मदत करण्यासाठीच फक्त आपण जन्म घेऊ. जन्मोजन्मीच्या सोबत्याबद्दलचे नियम सुद्धा बदलले जातील.

आपल्या अंतर्यामी स्तब्धता असते. आपला गाभा नित्य निश्चल असतो. मंत्रजप केल्यानंतर आणि धारणेचा सराव केल्यानंतरच आपण स्तब्धतेच्या अवस्थेत प्रवेश करतो. जेव्हा आपण चराचर सृष्टीच्या गाभ्यातील स्तब्धतेशी संपर्क साधतो, तेव्हा आपल्याला अपरंपार प्रेम, शांती आणि जे जे चांगले व आध्यात्मिक आहे ते ते सर्व मिळते. स्तब्धता प्रस्थापित करण्यासाठी आपण ध्यान करतो. त्यामुळे आपल्या सभोवती, कित्येक पटीत जास्त असलेल्या आणि अधिक गाढ अशा स्तब्धतेशी आपला संपर्क होतो. सृष्टीच्या मूल स्त्रोताशी संपर्क प्रस्थापित करून कल्पनातीत अशा निश्चलतेचा अनुभव घेणे आपल्याला शक्य होते.

ह्या पृथ्वीवर जे जे म्हणून विस्मयकारक आणि सकारात्मक आहे त्या सर्वांची जेव्हा आपल्याला जाणीव होते आणि ही सुद्धा जाणीव होते की आपण सारे एकच आहोत तेव्हा एकात्मतेचा अनुभव घेणे शक्य होते. अंधकाराला हुसकावून लावण्यात त्याची मदत होते. आता ह्या ग्रहावरून अंधकाराचे उच्चाटन करण्याची वेळ आली आहे. आपण जेव्हा एकात्मतेचा अनुभव घेतो तेव्हा ऋषींकडून आपल्याला भरपूर शक्ती मिळतात.

आपण जेव्हा ऋषींचे कार्य हाती घेतो किंवा साधना करतो तेव्हा सर्वप्रथम आपल्याला सर्व वैयक्तिक बाबी दूर ठेवाव्या लागतात, अहंकाराला दूर ठेवावे लागते आणि केवळ ऋषींच्या हातातील साधन बनून राहावे लागते. आपल्याला आदर्श बनून जगावे लागते आणि भविष्यात लोकांना मार्गदर्शन करण्याच्या आपल्या भूमिकेचे सतत भान ठेवावे लागते.

तुम्ही साधनेला सुरवात करता तेव्हा शंका आणि प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. धीर धरा. आमची पुस्तके वाचा. फार चिकित्सा करू नका कारण त्यामुळे तुमच्या प्रगती मध्ये बाधा येते.

**२०–०९–२००९**

तुमच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी तुम्ही

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

स्वतःच सर्वात योग्य व्यक्ती असता. आणि यासाठी एकच कसोटी आहे ती म्हणजे तुमचा अहंकार. जर आपण आपल्या अहंकाराची पातळी खाली आणू शकलो तर आपण खूप प्रगती केलेली असते.

काही विशेष महत्त्वाच्या सूचना आहेत ज्या आपण पाळायला हव्या:

आपल्या सर्वांजवळ सुरक्षा कवच आहे. रोज अर्धा तास ह्या कवचाला बळकटी देणे महत्त्वाचे आहे. जर एखादा साधक तीन तास ध्यान करत असेल तर तो आधी अर्धा तास सुरक्षा कवच बळकट करू शकतो आणि त्यानंतर उरलेला वेळ ध्यान करू शकतो. इतर पायऱ्यांवर ध्यान करणारे लोक अर्धा तास कवच बळकट करू शकतात आणि त्यानंतर निराळ्या वेळी ते निर्धारित काळासाठी ध्यान करू शकतात. सर्वप्रथम प्राथमिक तयारी करावी, कवच बळकट करावे आणि त्यानंतर ध्यान करावे.

तसेच प्रकाश प्रवाहित करणे हाही साधनेचा भाग आहे.

अतिशय नवीन आणि महत्त्वाच्या सुधारणा होत आहेत. इथे आपल्यापाशी उघड केल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी आपण आपल्यापाशीच ठेवूया.

आमच्याकडून स्पष्ट सूचना मिळेपर्यंत कोणीही सूक्ष्म जगात प्रवास करू नये. तुम्ही मांसाहारी जेवण घेणे बंद केले पाहिजे. या मागचा हेतू तुम्हाला नेहमी सुरक्षित ठेवणे हा आहे. आपण नकारात्मकतेला जाणीवपूर्वक आणि संपूर्णपणे अव्हेरले पाहिजे.

डिसेंबर २००९ पर्यंतचा काळ फार महत्त्वाचा आहे. तेव्हा सावध राहा. एकदा का आपण तो काळ पार केला की एका विशिष्ट दृष्टिकोनातून आपण सुरक्षित असू. २००९ ते २०१२ हा वेगळा काळ असेल. तो पार करणे सुद्धा तितकेसे सोपे नसेल.

रा मंदिरात आपण संकलित केलेल्या रा शक्ती आता जगाला उपलब्ध करण्यात आल्या आहेत. जेव्हा जेव्हा आपण ध्यान करतो, प्रार्थना करतो किंवा अशा कार्यात सहभागी होतो तेव्हा ह्या शक्ती आपल्याला मिळतात. १४ तारखेला दुपारी साडेचार वाजता आपल्या सर्व ध्यान साधकांमध्ये ह्या शक्ती संचारित करण्यात आल्या. ह्या एका निराळ्या विश्वातून येणाऱ्या, खूप महत्त्वाच्या, विशेष आणि अतिशय नवीन शक्ती आहेत ज्या आपल्याला अनेक तऱ्हांनी मदत करतात. आपण कोणत्याही बदलाला विरोध करतो, चांगल्याला विरोध करतो आणि चुकीच्या गोष्टींची निवड करतो, त्यामुळे आपल्या शरीर व्यवस्थेमध्ये एक प्रकारे घर्षण होऊ शकते, ज्याच्या परिणाम स्वरूप कोणत्याही स्तरावर उलथापालथ होऊ शकते. काहीही घडले तरी एकदम घाबरून जाऊ नका. तुम्ही देवाच्या आणि रा शक्तींच्या अत्यंत सुरक्षित हातांत आहात. शुद्धिकरणाच्या प्रक्रियेत निरनिराळ्या स्तरांवर असे गोंधळ ओढवतात.

त्राटक लावताना तुमची नजर हलवून एका बिंदूपाशी नेऊन दृष्टीला ताण देऊ नका. तुम्ही फक्त सरळ पाहायचे आहे आणि डोळे मिटायचे आहेत. जर तुम्ही त्राटक व्यवस्थित लावू शकलात तर तुम्हाला शांततेच्या प्रांतात प्रवेश करणे सोपे जाते.

काल गोलाहल्ली येथे नूतनीकरण करण्यात आलेल्या मंदिरात येल्लम्मा देवीची स्थापना करण्यात आली. ऋषींनी तिला पुष्कळ शक्ती आणि सूचना दिल्या. ती हर तऱ्हेने आपले रक्षण करेल.

### २७-०९-२००९

सर्व ठिकाणच्या पवित्र ग्रंथांत उत्तुंग ज्ञान उपलब्ध आहे. आम्ही आणि इतर अनेक महान लोकांनी गोळा केलेले ज्ञान वेदांचा हिस्सा बनते आणि ते सदासर्वदा वाढत जाते. हे सर्व ज्ञान एका पुस्तकात किंबहुना पुस्तकांच्या एका संचात समाविष्ट करण्याची वेळ बहुदा आली आहे.

बुद्धीचा वापर जर नीट केला नाही तर ती बेलगाम तर्कटं करीत राहते. आता मात्र आपण अधिक वेळ न दवडता बुद्धिच्या पलीकडे गेले पाहिजे आणि प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे, कारण अनुभवच आपल्याला प्रेम, चैतन्य आणि इतर वास्तवांचे यथार्थ ज्ञान देतो. मूल स्त्रोताकडून थेट ज्ञान मिळविण्यासाठी आपण ह्या अनुभवण्याच्या प्रांतात प्रवेश केला पाहिजे आणि निसर्ग, चंद्र, पृथ्वी, वारा, अग्नि वगैरे एकूणएक गोष्टी अनुभवल्या पाहिजेत. असे केल्या नंतरच एक प्रकारे संपर्क घडतो आणि संवाद शक्य होतो.

गीतेमध्ये असा उल्लेख आहे की योगी मानवी कायद्यांच्या वर असतो. काळाच्या एखाद्या टप्प्यावर जर मानवी कायदे आपल्यावर बंधनकारक नसतील तर त्यावरचे कायदे आपल्यावर बंधनकारक असतात. योगी वरचे कायदे पाळतो आणि त्यामुळे मानवी कायदे त्याच्यावर बंधनकारक नसतात. जेव्हा ऋषींचे कार्यकर्ते इथे जन्म घेतात, तेव्हा ते सर्व मानवी कायदे पाळतात, महान कार्य करतात आणि आदर्शभूत जीवन व्यतीत करतात. ते जगण्याचे महा खडतर मार्ग निवडतात. ह्या कार्यकर्त्यांवर आणि ऋषींवर देवाचे विशेष प्रेम असते. ते देवाच्या अतिशय समीप असतात. ते आपल्याला मार्गदर्शन करू शकतात.

२१ डिसेंबर २००९ पासून आपल्याला स्वबळावर व स्वतःच्या विवेकाच्या मदतीने स्वतःच्या पायावर उभे राहावे लागेल आणि आयुष्याला सामोरे जावे लागेल. अडखळत का होईना, पण पहिली पाऊले टाकून आपल्याला सुरवात करावी लागेल. आपल्याला निवड करावी लागेल आणि परिणामांना तोंड द्यावे लागेल आणि जोखीम घ्यावी लागेल. ऋषींकडून आपल्याला प्रत्येक पायरीवर मदत नेहमीच व निश्चितपणे मिळेल.

ह्या आपल्या मार्गामध्ये अतिशय गुंतागुंतीची गोष्ट देखील सोपी केलेली आहे. आपण वास्तवे आणि तत्सम इतर अनेक गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. या मार्गदर्शनाच्या आधारे आपण सहजपणे स्वतःची तयारी करू शकतो. तयारी करणे ही आपली जबाबदारी आहे.

आपल्या साधने द्वारे आपण करत असलेले सायास आपल्याला २०१२ सालातून तरून नेण्यास पुरेसे नाहीत. आपल्याकडे संयम असला पाहिजे, जो श्रद्धेतून येतो. श्रद्धा प्रेमातून येते. सर्व शंबला तत्त्वांचे पालन करा, तयारी करा, स्वबळावर उभे राहा आणि पुढे चला.

२०१२ संबंधी आम्ही पुष्कळ ज्ञान उपलब्ध करून दिले आहे आणि हेही स्पष्ट केले आहे की तुम्ही घाबरून जाण्याची गरज नाही. आपण प्रामाणिक आणि सज्जन होण्याची निवड करूया. फक्त देवाशी एकरूप व्हा, मग तुम्हाला सर्व संरक्षक ढाली मिळतील.

आपण हे लक्षात ठेवूया की आपण मानवतेला मदत करणारे भविष्यातील नेते असू हे आपल्याकडून अपेक्षित आहे.

अहंकार हा प्रगतीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. अहंकाराने पछाडलेल्या तरुण मनुष्याच्या आत एक राक्षस तयार होत असतो. जर आपण या अहंकाराला दूर ठेवू शकलो तर आपण राक्षस बनणार नाही. त्यासाठी आपण सावध राहूया.

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट मानसा फाऊंडेशनच्या नावाने काढावा. बंगलोर बाहेरील चेक असल्यास रू. ५० अधिक जोडावे.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

(संकलन: वैशाली जोशी, अनुवाद: वैशाली जोशी)

'Beyond 2012' ह्या पुस्तकात, अगोदरचे पुस्तक '2012-End or Beginning' ह्या पेक्षाही अधिक ज्ञान आहे. ह्यातील नवीन माहितीची संपत्ती अप्रतिम आहे जी तुम्ही सर्वांना प्राप्त करून दिली आहे. तुम्ही आणि ऋषी जे काही मानवजाती करता व जगाकरता करीत आहात त्याकरता मी आपला आभारी आहे. –खुर्शीद

'Beyond 2012' हे पुस्तक वाचताना मला निरनिराळे अनुभव आले. मी हे पुस्तक वाचायला सुरु केल्याक्षणी माझे डोळे उघडे असून देखील माझी जाणीव उच्च पातळीवर पोहोचली. पुस्तक वाचत असताना मला पुस्तकातून सतत पुष्कळ शक्ती मिळत होत्या. हा एक दुर्लभ आणि सुंदर अनुभव होता. –अर्चना पिल्लै

प्रत्येक महिन्यात आम्ही तुमच्या डीव्हीडीज्‌ची उतावीळपणे वाट पाहतो. डीव्हीडीज् आमचा तुमच्याशी व तुमच्या मार्गदर्शनाशी दुवा साधायचं काम करतात. ह्या आम्हा बाहेरील विद्यार्थ्यांकरिता, जे तुमच्या प्रत्यक्ष किंवा वैयक्तिक संपर्कापासून दूर आहेत, जीवनदायी धाग्या सारख्या आहेत.

–शुभदा लिमये

तुमच्या डीव्हीडीज् बाहेरील विद्यार्थ्यांकरता अत्यंत मौल्यवान आहेत. ह्यात समाविष्ट असलेले ज्ञान अतिशय मूल्यवान आहे. डीव्हीडीज् पाहिल्यावर माझ्या सर्व शंकांची व प्रश्नांची उत्तरे मला मिळतात. –प्रभाकर आपटे

बाहेरील विद्यार्थ्यांची जी काळजी तुम्ही घेता त्याकरिता मी तुमची आभारी आहे. डीव्हीडीज् आमच्याकरता अमूल्य देणगी आहेत. तुम्ही उच्चारलेला प्रत्येक शब्द बहुमोल आहे आणि आम्ही ध्यानवर्गात प्रत्यक्ष हजर न राहू शकल्याची उणीव डीव्हीडीज् भरून काढतात. तुम्ही इतक्या मोठ्या प्रमाणावर ज्ञान आणि गूढ गोष्टींचा उलगडा करून देता की, अनेक वेळा ऐकल्याशिवाय त्याचे पूर्ण आकलन होत नाही. प्रत्येक वेळी संदेश ऐकताना त्याचा नवीन पैलू उघडकीस येतो.

–शांता कुमारी

विमानाने प्रवास करताना मला कागदी टिश्यूज् चे अनेक डबे न्यावे लागतात कारण माझे नाक सतत गळते. पण जेव्हा मी दोन आठवड्यांसाठी मेक्सिको सिटी ला गेले होते, तेव्हा आश्चर्य म्हणजे असे अजिबात घडले नाही. मला असे वाटत होते की माझ्या सभोवताली एक अदृश्य कवच आहे. घरी परत आल्यानंतर मी तुमचा मेल बघितला व त्यात 'कवच' हा शब्द पाहून आश्चर्यचकित झाले!

'Beyond 2012' ह्या पुस्तकाने मला, मी स्वत:स कसे बदलले पाहिजे ह्याचा स्पष्ट दृष्टिकोन दाखवला. मला समजले की, मी 'एकतर–नाहीतर' ह्या परिस्थितीला तोंड देत आहे. एकतर मी स्वत:स बदलले पाहिजे नाहीतर विनाश निश्चित आहे, आणि मी हे ताबडतोब अंमलात आणले पाहिजे. तुमच्या कृपेकरता मी खरंच तुमची खूप आभारी आहे.

–लिन करातनी

मी स्वप्नात एका पांढऱ्या पोषाख घातलेल्या व पांढरी दाढी असलेल्या पुरुषास पाहिले. ते मला सांगत होते, "जे काही घडते आहे ते तुझ्या चांगल्याकरता आहे." गुरुजी, नंतर माझ्या लक्षात आले की ती व्यक्ती तुम्ही होता. 'Doorways to Light' हे पुस्तक वाचल्यानंतर तुमचे चरणस्पर्श करावे अशी माझी तीव्र इच्छा होती. आणि एका महिन्याच्या आतच तुम्ही मुंबईस भेट दिलीत. आता जीवन बदलून गेले आहे. आता प्रत्येक अडथळा सकारात्मक बनण्याची संधी आहे अशा दृष्टीने मी त्याकडे पाहते. तुमच्या मार्गदर्शनाकरता मी तुमची आभारी आहे. आता शांती आणि सहनशीलता वाढली आहे आणि माझी स्वप्ने साकार करण्यासाठी लागणारे सामर्थ्य ही वाढले आहे.

–गीता जोशी

नियमितपणे प्रकाशाचे प्रवहन करण्याचा आम्हाला प्रचंड फायदा झाला आहे. प्रकाश आम्हास मार्ग दाखवतो आणि आमच्या अडचणी एकेक करून सोडवतो. आमचे शुद्धिकरण झाले आहे. आम्ही स्वत:स बरे करण्याच्या तंत्राचा सराव करीत आहोत. तुमच्या आशीर्वादाने व दैवी प्रेमामुळे आमच्या जीवनाचा दर्जा सुधारला आहे. ह्याबद्दल तुमचे आभार. 'लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट'च्या संदेशाचा प्रसार करायचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. –देसाई

एके दिवशी जेव्हा मी तुमच्याशी मानसिक संपर्क साधला, तेव्हा जोरदार प्रकाश तुमच्याकडून माझ्याकडे वाहत असल्याचा अनुभव मी घेतला. मला खूप आनंद झाला आणि मला खूप उदात्त वाटत होते. मला गरजेच्या वेळी जे प्रेम, आस्था व मदत तुमच्याकडून मिळाली त्याकरता मी तुमचा आभारी आहे. तुम्ही दिलेल्या तत्त्वांचा प्रामाणिकपणे अभ्यास करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. –अभिषेक पाटणकर

तुमच्या पुस्तकांशी संबंध येईस्तोवर बिनशर्त प्रेमाचा अनुभव मला घेता आला नाही. आता मला समजले आहे की आपली स्वत:बद्दलची मते किती नुकसानकारक व फसवणारी असू शकतात. तुम्ही मला भेटलात ह्याचा मला खूप आनंद झाला आहे.

–कोमल कंधारकर

## प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. शाश्वत जीवन म्हणजे काय?**

उ. शाश्वत जीवन म्हणजे एकाच शरीरात कायम राहणे नसून जीवन-मृत्युच्या चक्रातून बाहेर पडून चिरंतन जगणे होय. शाश्वत जीवन म्हणजे, परमेश्वर जो शाश्वत आहे, त्याच्याशी एकरूप होणे.

**प्र. शक्ती आणि कंपने भिन्न असतात का?**

उ. एका पातळीवर ते भिन्न असतात. आपल्याकडे असलेल्या 'रा'शक्ती अद्याप सर्व जगात पसरवलेल्या नाहीत तरी त्यांची कंपने संपूर्ण पृथ्वीवर पोहोचत आहेत. अशा वेळी आपल्याला म्हणावे लागते की शक्ती भिन्न आहे. तिच्यातून निघणारी कंपने भिन्न आहेत. पण मुळात शक्ती ही कंपनरूप असते.

**प्र. मी ध्यान जास्त वेळ करू शकतो का?**

उ. होय. उत्तम. तीन तासांसाठी ध्यान करा आणि सकारात्मक होण्यावर भर द्या. शंबला तत्त्वांचा अभ्यास करा आणि प्रकाशाचे प्रसारण करा. नियमित आत्मपरीक्षण करा. आपण ध्यानाच्या कोणत्याही स्तरावर असू, आपण तेथून बदलायला सुरुवात करायला हवी.

**प्र. आपल्याला मुक्ती मिळण्यापूर्वी आपले प्रकाश शरीरात रूपांतरण होणे आवश्यक आहे का?**

उ. जेव्हा आपण परम शुद्ध असतो तेव्हाच आपल्याला मुक्ती व प्रकाश शरीर लाभते. परमशुद्ध असल्यावर साहजिकच आपोआप आपल्याला प्रकाश शरीर मिळते आणि नंतर मुक्ती मिळते.

**प्र. प्रकाश शरीर कोणत्या रंगाचे असते?**

उ. सर्वसामान्यत: ते पांढरे असते पण काही शरीरे सोनेरी, निळी किंवा हिरवी सुद्धा असतात. आत्मे मुळात कोठून आले आहेत ह्यावर प्रकाश शरीरांचा रंग अवलंबून असतो.

**प्र. २०१८ नंतर प्राणी त्यांच्या भौतिक शरीरातच वास करतील का?**

उ. त्यावेळी प्राण्यांच्या नव्या आणि पुष्कळ जाती असतील. सध्याचे प्राणी सुद्धा अस्तित्वात राहू शकतील.

**प्र. आता सत्य युगात प्रवेश करण्यासाठी स्थित्यंतराचा काळ कमी झाल्यामुळे, तुमच्या आणि महर्षी अमरांच्या योजना देखील बदलतील का?**

उ. आपल्याला हे स्पष्ट जाणून घ्यायला हवे की, योजना एकच आहे आणि ती आहे दैवी योजना. स्थित्यंतराचा काळ कमी झाल्याने सृष्टीत बऱ्याच सुधारणा आणि बदल घडून येत आहेत. त्यामुळे साहजिकच आमच्या योजना सुद्धा बदलत आहेत.

**प्र. २०१२ बद्दल मीडिया किंवा प्रसार माध्यमे मौन का आहेत?**

उ. नवयुगाच्या कार्यकर्त्यांनी २०१२ बद्दल खूप माहिती गोळा केली आहे पण प्रसार माध्यमे या गोष्टींचा उल्लेख करत नाहीत. जाणीवपूर्वक मुद्दाम या गोष्टी लोकांपासून लपवल्या जात आहेत. सरकारे असं करण्यास उत्तेजन देतात. यामागे त्यांचा काही हेतू असतो.

**प्र. जी माणसे बदलणार नाहीत, ती २०१२ नंतर या पृथ्वीवर त्यांच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत राहू शकतात का?**

उ. नाही. ती इथे राहू शकणार नाहीत.

**प्र. महर्षी अमरांनी सांगितले होते की, मृत्यू नंतर सूक्ष्मशरीर मुठीच्या आकाराचे होऊन जाते. या पृथ्वीवर परत जन्म घेईपर्यंत ते त्याच आकाराचे राहते का?**

उ. मृत्यू नंतर सूक्ष्म शरीर या शरीरापासून वेगळे होते आणि मुठीच्या आकाराचे होऊन जाते. मग ते एका वेगळ्या पृथ्वीवर जाते आणि तिथे एक रूप धारण करून तिथे विश्रांती घेते. विश्रांतीचा काळ संपल्यावर ते तिथे धारण केलेले शरीर सोडून या पृथ्वीवर पुन्हा जन्म घेते.

**प्र. आपला उच्च-आत्मा (higher self) त्याच्या अस्तित्वाच्या पातळीवर कर्मांचे संचय करतो का?**

उ. त्या पातळीवर कर्मांचे नियम आहेत किंवा नाही, हे आपल्याला माहीत नाही. उच्च-आत्मा, त्याच्या अस्तित्वाच्या पातळीवर असलेल्या नियमांचे पालन करतो.

**प्र. त्याचे तिथले जीवन आपल्याला या पातळीवर प्रभावित करते का?**

उ. होय. पण उच्च-आत्मा सतत अशा कार्यांमधे व्यस्त असतो ज्यामुळे त्याच्या आध्यात्मिक प्रगतीमध्ये मदत होईल. सर्वोच्च पातळीवर उच्च-आत्मा फक्त ध्यान करत असतो, तप करत असतो. ❑


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| Beyond 2012 | 80/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| New Age Realities | 200/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| A Package from the Rishis (containing 5 Booklets) - How to Meditate - Dhyana Yoga - Descent of Soul - Practising Shambala Principles - Astral Ventures of A Modern Rishi | 250/- |
| The Masters Answer | 120/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |


## ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)
मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)
द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)
द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)
उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)
यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

REGISTERED RNI. No. KARMAR/2008/27314
Date of posting Newsletter-25th of Every Month. No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

"मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र इथे तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### प्रकाशाचे प्रसारण

दर शुक्रवारी १० ते १ वाजेपर्यंत गुरुजींसोबत ध्यान–साधक प्रकाशाचे प्रसारण करतात. ह्यात सामील होण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: श्री. एकनाथ कुलकर्णी)

गेल्या आठवड्यामध्ये पहाटे ४ वाजता मी प्रकाशाची प्रार्थना करीत होते. अचानक मी जाणिवेच्या एका वेगळ्या पातळीवर गेले. मी एका मंदिरामध्ये होते आणि मला भगवान 'अनंत–शयन' दिसले. त्यांचा चेहेरा मला स्पष्ट दिसत होता. त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या हलत होत्या आणि ते माझ्याशी बोलत होते. मला काही शब्द ऐकू आले, "गुरुजी तुला बोलावत आहेत." मी एका खोलीमध्ये प्रवेश केला. तेथे गुरुजी बसले होते. मी त्यांच्या समोर बसले आणि त्यांचे शब्द माझ्या कानावर पडले, "जेव्हा केव्हाही मी तुला बोलावले, तू आली आहेस. आता परत मी तुला बोलावत आहे." एवढे बोलल्यावर गुरुजी मोठ्या ज्योतीच्या रूपात प्रकट झाले. त्यानंतर परत त्यांनी त्यांचे शरीररूप धारण केले. माझी खात्री करून घेण्यासाठी मी महर्षी विश्वामित्रांची प्रार्थना केली आणि विचारले कि हे स्वप्न होते का? लगेच मला उत्तर मिळाले, "कृष्णानंद तुला तिकडे बोलावत आहेत."

–नागश्री

८ सप्टेंबरला ध्यानामध्ये मी सूर्याभोवती प्रदक्षिणा घालीत असलेल्या पृथ्वीचे दृश्य पाहिले. अचानक आपली कक्षा बदलून पृथ्वी सूर्याच्या थोड्या जवळ गेली. ह्या घटनेमुळे पृथ्वीवर काही भागांमध्ये पूर आले आणि दरड कोसळण्याचे प्रकार घडले. सूर्यापासून येणारी प्रखर उष्णता सहन करणे लोकांना अशक्य होत होते.

–ऊषा सी.

काही दिवसांपूर्वी मी रा–मंदिराशी मानसिक संपर्क साधला. मी सूक्ष्म रूपाने मंदिराच्या खालच्या भागात असणाऱ्या झऱ्याजवळ गेले. तेथे असणाऱ्या प्रवेशद्वाराजवळ जाऊन आत शिरण्यास गुहेची परवानगी मागितली. गुहेने उत्तर दिले, "तू येथे ध्यान करू शकत नाहीस. परंतु ७ मिनिटे बसून रा–शक्ती ग्रहण करू शकतेस. या शक्ती येथे साठवल्या आहेत आणि सर्व साधकांना दिल्या जात आहेत." गुहेने मला तेथे असणाऱ्या इतर गुहांमध्ये प्रवेश न करण्याबद्दल बजावले. जेव्हा मी त्या इतर गुहांबद्दल विचारले तेव्हा त्या गुहेने मला असे सांगितले की, तेथे ७ गुहा आहेत. प्रत्येक गुहेमध्ये विशेष शक्ती आहेत आणि योग्य वेळेस त्या शक्ती नवनिर्मित सात पृथ्वींवर पाठवल्या जातील. मी त्या गुहेत प्रवेश केला, ७ मिनिटांकरिता शक्ती ग्रहण केली आणि परतले.

–नागमणी

१४ सप्टेंबर या दिवशी माझ्या मुलाला खूप ताप होता. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे आम्ही त्याला औषधे दिली. परंतु ताप उतरला नाही. ध्यान करणे मला शक्य झाले नाही आणि म्हणून मी निळा प्रकाश प्रवाहित करण्यास सुरुवात केली. मी निळा प्रकाश सर्व घरात पसरवला आणि माझ्या मुलाकडे पाठवला आणि अशा प्रकारे प्रकाशाचे प्रवहन करणे चालू ठेवले. १५ मिनिटातच माझा मुलगा गाढ झोपी गेला आणि त्याचा ताप सुद्धा उतरला होता. हे पाहून मी चकित झाले.

२५ सप्टेंबर या दिवशी प्रकाशाचे प्रवहन करीत असताना मला अचानक असे वाटले की 'मी', पृथ्वी एवढी विशाल झाले आहे आणि मला जाणवले की मी एक वेगळी व्यक्ती आहे. शांतता व शांतीचा मी काही मिनिटेच अनुभव घेतला असेल पण नंतर खूप वेळ मी त्यांच्या प्रभावाखाली होते. त्या वेळेस काही प्रश्न माझ्या मनामध्ये उद्भवले ज्यांची उत्तरे मला मिळाली. नंतर गुरुजींनी सांगितले की, मला मिळालेली उत्तरे बरोबर होती.

–किरणमई

जन्माष्टमीच्या दिवशी विशेष ध्यान करताना मी असे नवल करीत होते की, आपल्याला कण–स्वरूप का बनावे लागले, तेव्हा मला भगवान श्रीकृष्णांचा आवाज ऐकू आला. ते म्हणाले, "याचे कारण असे की जीवात्म्याने परमात्म्याशी एकरूप व्हावे आणि पूर्णाचा अनुभव घ्यावा म्हणून, कारण ते 'पूर्ण' मी आहे. म्हणून संपूर्ण शरणागत होऊन अनुभव घ्या. गेल्या वेळी मी सांगितले होते की, तू भौतिक शरीरापलीकडे जाऊन एकात्मतेचा अनुभव घे. तू याचा अभ्यास करावास असे मला वाटते. स्वतःला आधी प्रकाशाने संपूर्ण भरून घे आणि नंतर सर्व गोष्टींशी एकरूप होण्यासाठी स्वतःचा विस्तार करायला सुरुवात कर जेणेकरुन तू प्रत्येक गोष्ट तुझ्या कवेत घेशील व मग एकत्वाचा अनुभव घेशील."

–विद्या अरोरा

PRAKASHMARG An Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation, Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149.
Editor : Jayant Deshpande